# सहसंचालक,, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, सदर, नागपूर

दुरध्वनी क्र. 0712-2557266/46 कार्यासन दु. क्र. 0712-2557266

E-mail : ronagpur@dtemaharashtra.gov.in Website: rdtenagpur.org.in

क्र.तशिस/विकाना/शैवि-1/माहिती/2019/ 2616

दिनांक:- 26 AUG 2019

प्रति,

प्राचार्य/संचालक,
सर्व अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र/वास्तुशास्त्र/एच.एच.सी.टी/एमबीए,
एमसीए पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था,
नागपूर विभाग, नागपूर.

विषय:- शै. वर्ष 2018-19 व 2019-20 मध्ये अनुसुचित जमाती या प्रवर्गात प्रवेश घेणाऱ्या उमेदवारांच्या जात वैधता प्रमाणपत्राची पडताळणी करण्याबाबत..

संदर्भ:- तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. २अ/एडीएम/2019/668, दि. 19/08/2019

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, शै. वर्ष 2018-19 व 2019-20 आपल्या महाविद्यालयात अनुसुचित जमाती या प्रवर्गात प्रवेश घेणाऱ्या उमेदवारांनी सादर केलेल्या जात वैधता प्रमाणपत्राची पडताळणी निर्गमीत करणाऱ्या प्राधिकरणाकरून करण्याबाबत आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांनी कळविलेले आहे.

त्यानुसार आपल्या महाविद्यालयात शै. वर्ष 2018-19 व 2019-20 मध्ये अनुसुचित जमाती या प्रवर्गात प्रवेशीत विद्यार्थ्यांच्या जात वैधता प्रमाणपत्राची पडताळणी करून त्याबाबतचा अहवाल या कार्यालयाकडे व प्रवेश नियामक प्राधिकरण, म.रा. , मुंबई यांचेकडे सादर करावा.

(डॉ. चंद्रशेखर थोरात)
प्र. सहसंचालक
तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, नागपूर.

प्रत:- मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई (का.क्र. २अ) यांना माहितीकरीता सविनय सादर.

# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६१०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : desk2a@dtemaharashtra.org.in Internet :http/www.dtemaharashtra.gov.in


क्रमांक : २अ/एडीएम/२०१९/[illegible]
दिनांक 19 AUG 2019

प्रति,
सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती, औरंगाबाद, मुंबई, नागपूर, नाशिक, पुणे

विषय : शैक्षणिक वर्ष २०१८-१९ करिता अनुसुचित जमाती या प्रवर्गासह इतर राखीव प्रवर्गात प्रवेश घेणा-या उमेदवारांच्या प्रमाणपत्र पडताळणीबाबत.....

संदर्भ : सहसंचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे यांचे पत्र क्रमांक आसंप्रसं-२०१९/प्र.क्र.१६/का-३/१७८२ दिनांक २१.०६.२०१९

महाराष्ट्र राज्यातील विविध वैद्यकीय महाविद्यालयात अनुसूचित जमातीच्या राखीव जागेवर बनावट वैधता प्रमाणपत्रे सादर करुन १९ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्याच्या तक्रारीच्या अनुषंगाने यापुढे देखिल अनुसूचित जमातीच्या राखीव जागेवर बनावट वैधता प्रमाणपत्राच्या आधारे मेडिकल व इंजिनिअरींगला विद्यार्थी प्रवेश घेऊ शकत असल्याची शक्यता विचारात घेऊन त्यास प्रतिबंध करण्याकरिता यापुढे प्रत्येक शैक्षणिक वर्षात तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमाकरिता अनुसूचित जमातीच्या राखीव जागेवर वैधता प्रमाणपत्रांच्या आधारे प्रवेश घेऊ इच्छिणा-या किंवा प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या वैधता प्रमाणपत्रांची संबंधित अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती कार्यालयाकडून सत्यता पडताळणी (सदर वैधता प्रमाणपत्र संबंधित समिती कार्यालयाकडून निर्गमित झाले किंवा कसे?) करुन घेण्याबाबत संचालनालयाच्या अधिनस्त असलेल्या कार्यालयांना सूचना देण्यास संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात आले आहे. पत्राची प्रत सहपत्रासह सोबत जोडण्यात येत आहे.

पत्रामध्ये नमूद केल्याप्रमाणे प्रवेशित उमेदवारांचे प्रमाणपत्र पडताळणी बाबत कार्यवाही करण्याच्या सुचना आपल्या अधिनस्त व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या सर्व संस्थाना देण्यात याव्यात. तसेच सदर प्रवेश प्रक्रिया प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य मुंबई

E:\Desktop\Modak Mam\desk2a (Modak)\Verification of Caste Validity Certificate.docx


सहसंचालक, तंत्रशिक्षण
प्रादेशिक कार्यालय, नागपूर
आवक 5466
2 3 AUG 2019

यांचेमार्फत राबविण्यात येत असल्यामुळे यासंदर्भातील अहवाल त्यांचेकडे दिनांक १५.०९.२०१९ पर्यंत सादर करावा. तसेच केलेल्या कार्यवाहीची माहिती संचालनालयास सादर करावी.

(डॉ. अभय वाघ)
संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत : माहितीकरिता सादर

०१. सहसंचालक, आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था, महाराष्ट्र राज्य, २८, क्वीन्स गार्डन, पुणे ४११ ००१.

०२. मा. सचिव, प्रवेश नियामक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, ८ वा मजला, न्यु एक्सेलसिअर इमारत, फोर्ट, मुंबई ४०० ००१ (संदर्भिय पत्राची प्रत सहपत्रासह सोबत जोडण्यात येत आहे.)

०३. कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक १०, तंत्रशिक्षण, मुख्य कार्यालय, मुंबई यांना संदर्भिय पत्राच्या प्रतीसह माहिती व पुढील आवश्यक कार्यवाहीकरिता.

महाराष्ट्र शासन
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था,
२८ क्वीन्स गार्डन, पुणे-४११ ००१.
(Government of Maharashtra)
Tribal Research & Training Institute
28, QUEENS GARDEN, PUNE 411 001

दूरध्वनी -20/26360941
फॅक्स - 020/26360026
Tel- 020-2636 2071
Fax 020-26360026
E-mail -trti.mah@nic.in
Website-
trti.maharashtra.gov.in

क्र. आरसंप्रसं-२०१९/प्र.क्र.१६/का-३/9062
दिनांक /०६/२०१९

प्रति,

मा. संचालक
तांत्रिक शिक्षण संचालनालय
३, महापालिका मार्ग, धोबी तलाव, मेट्रो सिनेमा जवळ
मुंबई- ४००००१.

विषय :- मेडीकल आणि इंजीनिअरिंग कॉलेज मध्ये बनावट जात वैधता प्रमाणपत्राच्या आधारे अनुसूचित जमातीच्या जागेवर प्रवेश घेऊ इच्छिणा-या उमेदावारांना प्रतिबंध करणे बाबत.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्यातील विविध वैद्यकीय महाविद्यालयात अनुसूचित जमातीच्या राखीव जागेवर बनावट वैधता प्रमाणपत्रे सादर करुन १९ विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्याची तक्रार प्राप्त झाली होती. याबाबत चौकशी करून बनावट वैधता प्रमाणपत्राच्या आधारे प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द करून त्यांच्या विरोधात गुन्हे दाखल करण्यात आलेले आहे.

यापुढे देखिल अनुसूचित जमातीच्या राखीव जागेवर बनावट वैधता प्रमाणपत्राच्या आधारे मेडीकल व इंजीनिअरिंगला विद्यार्थी प्रवेश घेऊ शकता हे नाकारता येत नाही. त्याकरिता अनुसूचित जमातीच्या राखीव जागेवर वरिलप्रमाणे बनावट वैधता प्रमाणपत्राच्या आधारे प्रवेश घेणा-या विद्यार्थ्यांना प्रतिबंध करण्याकरिता यापुढे प्रत्येक शैक्षणिक वर्षात तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमाकरिता अनुसूचित जमातीच्या राखीव जागेवर वैधता प्रमाणपत्राच्या आधारे प्रवेश घेऊ इच्छिणा-या किंवा प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या वैधता प्रमाणपत्रांची संबंधित अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती कार्यालयाकडून सत्यता पडताळणी (सदर वैधता प्रमाणपत्र संबंधित समिती कार्यालयाकडून निर्गमित झाले किंवा कसे?) करून घेण्याबाबत आपल्या अधिनस्त असलेल्या कार्यालयांना आपल्या स्तरावरून योग्य त्या सूचना देण्यात याव्यात. सोबत या कार्यालयाचे अधिनस्त अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती कार्यालये त्यांचे अधिकार क्षेत्र, संपर्क क्रमांक व ई-मेल याबाबतची माहिती जोडली आहे.

सोबत - वरिलप्रमाणे.

(नंदिनी आवडे)
सहसंचालक
आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था
महाराष्ट्र राज्य, पुणे.

- 1 JUN 2019